

• Reg.No. : Latur/0000014/2018 (XXI of 1860) • Reg. of Public Trusts - F-0024903 (LTR) (BOM.XXIX of 1950)

# सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठान




## कोरोना जागर सामान्यज्ञान चाचणी परीक्षा – २०२१

**सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठान व प्रतिष्ठान अंतर्गत मराठी विज्ञान परिषद, पानगाव विभाग यांच्यातर्फे** कोविडसंदर्भाने अनेक अधिकारी व्यक्तींच्या अभ्यास, अनुभव, व्यासंग, चिंतन व बांधिलकीचा लाभ लोकांपर्यंत पोचवण्यासाठी दि. १३ जून, २०२१ पासून, दर रविवारी संध्याकाळी ५ वाजता, दूरस्थ पद्धतीने परिसंवाद मालिकेचे झूमद्वारे नि:शुल्क आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमातील तज्ज्ञ विचारवंतांच्या व्याख्यानांतून माहितीचा संकलित स्रोत तयार होणार आहे.

ही माहिती **सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठानच्या अधिकृत संकेतस्थळावर** परिसंवाद मालिकेनुसार वेळोवेळी उपलब्ध करून देण्यात येत आहे. तसेच, ठराविक कालावधीच्या अंतराने **कोरोनाविषयक सामान्यज्ञान चाचणीचे आयोजन** करण्यात येत आहे. अर्थात ती सर्व नागरिकांसाठी खुली असणार आहे.

तरी, सर्वांनी त्याचा – विशेषत: तरुण व विद्यार्थ्यांनी – अधिकाधिक संख्येने लाभ घ्यावा, ही विनंती. शिक्षक, मुख्याध्यापक, प्राध्यापक / प्राचार्य यांना विनंती आहे की, आपण आपल्या विद्यालयातील, महाविद्यालयातील विद्यार्थी, पालक, संस्थाचालक मंडळ (पदाधिकारी व सदस्य) तसेच ग्रामस्थ, युवक, तरुण, महिला व आबालवृद्ध यांच्यापर्यंत या उपक्रमाची माहिती देवून सहभागी होण्यास प्रवृत्त करावे व या जनजागृती उपक्रमात योगदान द्यावे, ही नम्र विनंती.

१. **https://www.skspratishthan.com या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या माहितीस्रोताखालीअसलेल्या आवेदन नमुन्याच्या साह्याने चाचणीत सहभागी होता येईल.**
२. **या चाचणीनंतर लगेच आपल्याला चाचणीचा निकाल आणि आकर्षक डिजिटल प्रमाणपत्र मिळवता येईल.**
३. **चाचणी कितीही वेळा देता येईल. सर्वांपर्यंत माहिती पोचवणे हाच केवळ उद्देश असल्यामुळे संकेतस्थळावरील माहितीच्या आधारे चाचणीप्रश्न सोडवावेत.**
४. **उपक्रमाच्या शेवटी या सर्व चाचण्यांचे मूल्यमापन लक्षात घेवून महाचाचणीचे आयोजन करण्यात येईल व त्या महाचाचणीतील विजेत्यांना पारितोषिके दिली जातील.**
५. **याबाबतीत सर्व अधिकार प्रतिष्ठानला असतील.**